# राशिभविष्य - जून, २०२१.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==============================================================

**सूचना -** प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या-त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेल्या त्या-त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. कारण आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत हर्षल असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अस्थिर, लहरी, चंचल असा होण्याची शक्यता दिसते. तसेच कोणी काही समजावण्याचा प्रयत्न केला तर अपमान वाटून संतप्त व्हाल. या काळात या राशीची लहान मुले तर अतिशय खोडकर व विक्षिप्त आचरणाची होणे संभवते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी महिन्याच्या पूर्वार्धात रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखास प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. रवि ग्रह अनारोग्यकारक होईल, व त्याच्यामुळे नेत्रविकार, कौटुंबिक वाद, भांडणे त्रस्त करतील. पण बुध ग्रह प्रतिकुल असला तरी थोडा अर्थलाभ होणे संभवते. राहूमुळेही आर्थिक चिंता व काहीही कारणाने होणारे कौटुंबिक वाद , भांडणे असह्य मनस्ताप देण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल, आरोग्यदायक व सुखकारक होईल. त्याच्यामुळे या राशीच्या शासकीय नोकरदारांपैकी कोणास बढती मिळेल, कोणाच्या कार्यकुशलतेवर वरिष्ठ प्रसन्न होतील, क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान किंवा उच्च पद मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. रविशिवाय या तृतीय स्थानी असलेला शुक्र ग्रहही महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईत व त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ, काही

मंडळींना प्रतिष्ठा तर काहींना मानसन्मान प्राप्त होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल व सर्व सुख मिळेल. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी महिन्याच्या संपूर्ण काळात मंगळ ग्रह आहेच. पण तो नीच राशीत असला तरी त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळेही कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. त्याशिवाय या राशीच्या काही मंडळींना त्वचारोग, रक्तविकार किंवा मुखदन्त विकार अशापैकी आजार होणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी स्वराशीत शनि ग्रह असून तो कोळसा, लोखंड असा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह अनुकुल तर नेपच्यून ग्रह प्रतिकुल होण्याची शक्यता आहे. गुरु ग्रह सर्व प्रकारे सुखकारक होईल, काही मंडळींना विवाहयोग प्राप्त होईल, विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करणे शक्य होईल, इच्छाआकांक्षा पूर्ण होतील; पण नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होण्याची शक्यता आहे. काही मंडळींना कुमार्गी मित्रापासून त्रास होईल व नैराश्य येईल. जपा. श्रद्धा असेल “श्रीगणेश उपासना “ अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः” या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या संपूर्ण काळात रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्यामुळे तो अनारोग्यकारक व मानसिक चिंता देणारा असल्याचाच अनुभव येईल. तसेच आर्थिक चिंताही त्रस्त करतील. त्याशिवाय घरीदारी वाद, भांडणे होण्याची शक्यताही आहे. महिन्याच्या पूर्वार्धात या रविसह बुध आणि राहू हे दोन ग्रह असल्यामुळे बुधामुळे मनस्थिती चंचल होईल व त्यामुळे कुसंगतीचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. त्यातून धननाश होणे, मित्रद्रोह होणेही शक्य दिसते. राहूमुळे वातविकाराचा त्रास होणे संभवते. तसेच अपमान झाल्यास सूडभावना प्रबळ होईल. अस्थिर मनस्थितीमुळे अपघात भयही आहेच. जपा. या राशीच्या

धनस्थानी मिथुन राशीत शुक्र ग्रह आहे. त्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या स्थानी आल्यावर अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत मंगळ ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र ग्रह या स्थानी येत आहे. मंगळ ग्रहास कर्क राशी फारशी अनुकुल नसल्यामुळे इच्छा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा अपूर्ण राहतील; पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे अशुभ असे काही घडणार नाही. या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व यशदायक होईल. नोकरदार मंडळींपैकी काहीवर वरिष्ठ खूष होतील, काही मंडळींना मानसन्मानाचे भाग्य लाभेल तर काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यताही दिसते. येथील नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्या[पूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी " ओम ब्रह्माय नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोमसोमाय नमः " या तारकमंत्राचा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत रवि, बुध , राहू असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी जात आहे. रवि ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, शरीरपीडा, मनस्ताप, मानभंग होणे, प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. बुध ग्रहामुळे हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, मानहानी होणे संभवते. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. पण येथील राहूमुळे काहीजणांना अर्थलाभ होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या प्रथम स्थानी

शुक्र ग्रह असून त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात सर्व सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह प्रथम स्थानी आल्यावर अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत मंगळ असून महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र या धनस्थानी येत आहे. मंगळ ग्रह नीच राशीत असल्यामुळे फारसा प्रतिकुल होणार नाही; पण त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह धनस्थानी आल्यावर कौटुंबिक सुख, वैवाहिक जीवनातील सुख लाभेल व धनलाभही होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे मनस्ताप होणे, अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरूमुळे अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. व्यवसायात प्रगतीच्या उत्तम संधी मिळतील, उत्कर्ष होईल, प्रवासाचे योग येतील. येथील नेपच्यूनही आध्यात्मास अनुकुल असून उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित असे काही सांगता येत नाही. पण त्याच्यामुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. पण त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी " ओम सोमसोमाय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम शंकराय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात व्ययस्थानी असलेला शुक्र या राशीच्या प्रथम स्थानी कर्क राशीत येत आहे. मंगळ त्याच्या कर्क या नीच राशीत असल्यामुळे फारसा प्रतिकुल होणार नाही; तरीही स्वभाव हटवादी होणे संभवते.

त्यामुळे अकारण श्रम, दगदग होणे, शरीरपीडा होणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या प्रथम स्थानी कर्क राशीत आल्यावर परिस्थितीत सुधारणा होईल व सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो गूढ संशोधन कार्यास अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे कुसंगतीची बाधा होणे संभवते. तसेच विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होऊ शकेल. या स्थानी असलेला नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका, बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक आणि यशदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळींना बढती मिळू शकेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना आर्थिक लाभ होतील. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून रवि व बुध ग्रह अनुकुल व लाभदायक होतील. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व या राशीच्या काही शासकीय नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ होणे संभवते. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल. आरोग्य चांगले राहील. बुध ग्रहही अनुकुल असून त्याच्यामुळे धनलाभ होईल, मित्रलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. राहूमुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील, अधिकारी मंडळींना अधिकाराचा गैरवापर करून वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. पण त्यांनी तो मोह आवरावाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. या लाभस्थानी असलेला रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. पण शुक्रामुळे मधून मधून सुखकारक घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी

“ओम अदितीये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः::” या तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही,

सतत कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे . बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. पण त्याच्यामुळे गैरसमजुती होणे, भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह अनुकुल तर नेपच्यून प्रतिकुल होईल. गुरु ग्रहामुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील, काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल, अर्थलाभ होईल, प्रवासयोग येईल. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. पण नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, संकट येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत रवि , बुध व राहू असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी जाईल व महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होईल. या रविमुळे या राशीच्या काही मंडळींना आर्थिक, सामाजिक दर्जा प्राप्त होईल, काहींना कीर्ती-प्रसिद्धी मिळू शकेल तर काहींना मानसन्मान प्राप्त होईल. महिन्याच्या उत्तरार्धात अर्थलाभ होईल, व्यावसायिक प्रगती होईल व आरोग्य उत्तम राहील. बुधामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, धनवृद्धी होईल. राहूही अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना नोकरीत एखादे अधिकारपद मिळू शकेल. हाती घेतलेल्या जबाबदारीच्या कामात यश मिळेल. त्यामुळे त्यांचा सन्मान होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत शुक्र असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व सुख, समाधान मिळेल व मनःशांती लाभेल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत जात आहे. त्यावेळीही तो सुखकारकच होईल. पण या व्ययस्थानी

कर्क राशीत मंगळ ग्रहही आहे. तो पूर्णपणे अशुभ असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता, वाद, भांडणे, मानहानी होणे संभवते. तसेच मनस्थिती अस्वस्थ राहील. शृद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मनःशांती देईल. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून शृद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी " ओम पितराय नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण कसले तरी मानसिक दुःख मानसिक स्थिती अस्वस्थ ठेवील. म्हणून या राशीच्या मंडळीनी मनःशांतीसाठी अध्यात्मिक उपासनेत मन गुंतवावे. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून ज्यांचे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र आहे त्यांना तो अनुकुल होईल. पण स्वभाव संशयी, स्वार्थी, व्यवहारी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील, पण नेपच्यूनमुळे उगीचच एखादी आजार भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो अपघातकररक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल, व महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल. त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात भय, मानसिक ताण, निराशा, आजार, वडील मंडळींचा विरोध अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व भरभरून सर्व काही देईल. सन्मान, कीर्ती, प्रसिद्धी, हुद्दा असे काही मिळू शकेल. या दशम स्थानी प्रथमपासून शुक्र ग्रह आहेच. पण तो प्रतिकुल असून ज्यांचे कलात्मक नोकरी-व्यवसाय आहेत त्यांना नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे सहन करावे लागतील. त्यामुळे मनस्ताप, दुःख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. येथील शुक्र ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत जात आहे. त्या स्थानी मंगळ आहेच. येथील मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट येण्याची शक्यता आहे. काही मंडळींना कष्ट परिशृम करूनच

आर्थिक लाभ होईल. पण आ राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही शक्य आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या लाभस्थानी आल्यावर अनुकुल होईल व सर्व सुखसमाधान लाभेल व मनःशांती मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो कौटुंबिक जीवनातील सुखास प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य हानी होण्याची शक्यता असते. दुःखद घटना घडतात व नैराश्य येते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. पण हा नेपच्यून गूढ संशोधन कार्यक्षेत्रात रस असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. गुरु ग्रहही अनुकुल असून त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते अधिक घट्ट होतील. अर्थलाभ होईल व सर्व सुख लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनात पतिपत्नीमध्ये वाद, भांडणे, मतभेद, दोघांपैकी एकाचे लहरी, विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. जपा. तसेच ज्यांचे भागीदारीत व्यापार-व्यवसाय असतील त्यांनी संशय, मतभेद, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मिथुन राशीत जात आहे. बुध -राहू अनुकुल होतील पण रवि ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात पूर्णपणे प्रतिकुल होईल. त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, हाती घेतलेल्या कार्यात अडचणी, अडथळे येऊन

अपयश येईल. संततिसुखात बाधा येईल, भावनेच्या भरात वाटेल ते केले जाईल, नोकरीत मानसिक ताण सहन करावा लागेल, मानहानी होणेही संभवते, घरात वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. पण बुधामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणाऱ्या या राशीच्या काही मंडळींना यश व कार्यसिद्धीचे सुखसमाधान लाभेल. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल, पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होऊ शकेल. शुक्र ग्रह महिन्याच्या २१ तारखेपर्यंत अनुकुल व लाभदायक होईल. त्याच्यामुळे गुरुकृपा, थोरकृपा, सुसंगती, काही मंडळींना कीर्ति -प्रसिद्धी मिळू शकेल. सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होणार असून तो कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना प्रतिकुल होईल व नियोजित कार्यक्षेत्रात अडचणी, अडथळे निर्माण होतील व दुःखी व्हाल. या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत मंगळ ग्रह आहेच. पण तो नीच राशीत असल्याने अशक्त असल्याने औषधविक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना फारसा लाभदायक होणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. दररोज रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः "मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः " तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून त्याच्यामुळे मनस्थिती आनंदी राहील; पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्याने सतत सावधानतेने आचरण करा, वाहन नियंत्रित वेगात व सतत सावधानतेने चालवा. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी लागेल किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंड -विषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील, पण एखाद्या नातेसंबंधातील व्यक्तीकडून मनस्ताप

दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. नेपच्यूनमुळे घरगुती संबंधात गैरसमज, आर्थिक घोटाळे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना पूरक होईल. पण या राशीच्या मंडळींनी सतत अति खोल विचारात मग्न राहू नये. कारण डोकेदुखी, मेंदूविकार होण्याची शक्यता असते. त्याशिवाय काही मंडळींना मुदतीचा ताप येणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून येथील रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात हा रवि प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, अपयश, संततिसुखात बाधा, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे अशापैकी घटना घडू शकतील. तसेच या राशीच्या सप्तम स्थानी असलेले बुध -राहूही प्रतिकुल होणार असून बुधामुळे मनस्ताप, दुःख, भांडणे, वियोग अशापैकी घटना घडणे संभवते. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच मनात कपटी विचार प्रबळ होण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत शुक्र ग्रह आहेच. तो या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुल होईल; पण त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल; काही मंडळींना वारसाहक्काने धनलाभ होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत गेल्यावर अनुकुल होईल व सुखसमाधान लाभेल. या भाग्यस्थानी कर्क राशीत मंगळ ग्रह आहेच. पण तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना मूळव्याधीसारखे उष्णताविकार त्रस्त करतील. शिवाय हाडमोड होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्याशिवाय तो वीजभयकारक व जलभयकारक असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. जलप्रवास टाळा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र

अनुराधा आहे त्यांनी " ओम मित्राय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी " ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या धन व कौटुंबिक सुखस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता असते. जपा. त्याशिवाय आर्थिक संकटेही त्रस्त करण्याची शक्यता असते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु ग्रहामुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. शिवाय या राशीच्या मंडळींना प्रवासाचे योग येतील. पण या गुरुमुळे भावंडांपैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मनःशांती मिळू शकेल. तसेच हा नेपच्यून गूढ संशोधनाची आवड असणारांना प्रगतिकारक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काही मंडळींना परदेशवारीचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल हा अंतर्ज्ञान देणारा ग्रह असून त्याच्यामुळे गूढ संशोधन आणि उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना तो प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत रवि -बुध व राहू असे तीन ग्रह असून रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील, पण काही मंडळींना अनारोग्याचा त्रासही सहन करावा लागेल. बुध ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यसिद्धी होईल. शिवाय धनलाभ होणेही संभवते. राहूमुळे ज्यांचा अन्य जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना तो लाभदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत शुक्र ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या स्थानी येत आहे. शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुख मिळेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. जीवनसाथी/संगिनी कलाकार असेल तर त्याच्या कलेचा आनंद मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात रविमुळे वैवाहिक जीवनात जीवनसंगिनीची अधिकारशाही सहन करावी लागेल. शिवाय येथील रवि ग्रह अनारोग्यकारक असल्यामुळे विशेष करून तो पोटविकाराचे आजार देण्याची शक्यता आहे. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या अष्टम स्थानी जात आहे. त्यावेळी तो लाभदायक होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा धनलाभ होण्याची शक्यता आहे. पण हा शुक्र वृद्ध मंडळींना

प्रतिकुल होईल. या अष्टम स्थानी कर्क राशीत मंगळ ग्रह असून तो अनारोग्यकारक होईल व शारीरिक उष्णता भडकून मूळव्याधीसारखे आजार त्रस्त करतील. त्याशिवाय हाडमोड होणेही संभवते. जपा. त्याशिवाय तो जलभय, वीजभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे व "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने दररोज रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी " ओम निऋतये नमः" मंत्राचा , ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी " ओम उदकाय नमः" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच कुटुंबातील कोणाचे स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ राहील. पण या शनीमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. त्याशिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या धन व कुटुंब स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल. उत्तम अर्थलाभ होईल. पण येथील नेपच्यूनमुळे आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची चिंता त्रस्त करील. त्याशिवाय आर्थिक संकटे येणेही संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे आहे त्या परिस्थितीत कौटुंबिक सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत जात आहे. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्यकारक होईल. नोकरीत वरिष्ठांची मनमानी सहन करावी लागेल. नातेसंबंधात दुरावा निर्माण होईल, मनस्थिती अस्वस्थ राहील. संततीच्या अनारोग्याची किंवा आचरणाची चिंता त्रस्त करील. त्याशिवाय तो

अपघातकारक होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि षष्ठ स्थानी गेल्यावर परिस्थिती सुधारेल व भाग्योदयकारक होईल. नोकरी-व्यवसायास तो पूरक होईल, व मनःशांती लाभेल. हितशत्रू पराभूत होतील. बुधामुळे संतती-स्त्रीपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. राहूमुळे ज्यांचा दलाली-कमिशनवर व्यवसाय आहे अशांना उत्तम अर्थलाभ होईल. मात्र या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत शुक्र आहेच. पण ज्यांचे कलाक्षेत्र आहे त्यांना उच्च कलागुण असूनही कलेत प्रगती करणे जमणार नाही. कलागुण व्यक्त करण्यासाठी संधीच मिळणार नाही. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत जात आहे. त्या स्थानी मंगळही आहेच. या मंगळामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे जीवनात सुखसमाधान लाभेल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, यश लाभेल व प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्री हनुमानाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ ओम विश्वेदेवाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी ओम “श्रीविष्णवे नमः:” मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु-नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील गुरु ग्रह शुभ असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो प्रगतिकारक होईल, आणि या राशीच्या लेखकवर्गाचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. नेपच्यूनमुळे मनस्थिती कोमल व भावनाशील होईल, व नैराश्य येईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून तो उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व नियोजित कार्यात यशदायक होईल. त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत रवि - बुध - राहू असे तीन

ग्रह असून येथील रवि प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, आर्थिक चिंता, कौटुंबिक त्रास अशा घटना घडण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अधिक मनस्तापदायक होईल व त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. त्याशिवाय नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला बुध काही प्रमाणात अनुकुल होईल व त्याच्यामुळे मित्रसुख व गृहसौख्य लाभेल. पण धननाश होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. राहूमुळे कौटुंबिक त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला शुक्र ग्रह महिन्याच्या तीन सप्ताहात कलाप्रेमींना अनुकुल होईल व कलेतील आनंद मिळेल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेतील प्रगती दाखविण्याची संधीच मिळणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत प्रथमपासून मंगळ ग्रह आहेच. त्याच्यामुळे उष्णता विकार बळावतील. त्यामुळे रक्तविकार, हृदयविकार, ताप येणे, इजा होणे, फोड येणे अशापैकी अनारोग्य होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक हानी होणे, चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे करू नये. आहे तो नोकरी-व्यवसायच मनापासून करावा. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो प्रतिकुल होईल. म्हणून या राशीच्या मंडळींनी सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करावेत. तसेच या शनीमुळे नोकरी-व्यवसायात मानहानी होणे व अनारोग्य होणेही संभवते. शृद्धा असेल तर शृीशिवोपासना व शृीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर शृीशिवोपासना व शृीहनुमान उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून शृद्धेने “शृीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “शृीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून शृद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धन, कुटुंब व वाचा स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे मन व बुद्धी अतिशय अस्थिर, चंचल होईल व त्यामुळे अविचाराने खर्च होणे, विचित्र आचरण घडणे, फटकळपणे बोलून अकारण समोरच्याचा अपमान करणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत रवि - बुध -राहू असे तीन ग्रह असून रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. कार्य दिरंगाई

होईल, दुःखद घटना घडतील व त्यामुळे नैराश्य येईल. शिवाय त्याच्यामुळें अनारोग्य होणेही शक्य आहे. बुध ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होईल व अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच हितशत्रूंपासून मनस्ताप होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. राहू ग्रह मनस्थिती उत्साहदायक ठेवील; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत शुक्र ग्रह आहेच. त्याच्यामुळे सर्व सुख व ऐषाराम मिळेल. ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत जाईल तेव्हा सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे सहज शक्य होईल. पण या पंचम स्थानी कर्क राशीत मंगळ ग्रह आहेच. तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मुलांपैकी कोणाच्या अयोग्य आचरणाची समस्या मनस्ताप देईल. याशिवाय संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना स्थावरविषयक समस्या त्रस्त करील. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींकडून “वरून कीर्तन, आतून तमाशा” असे ढोंगी, धूर्त आचरण होणे संभवते. तसेच या केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो सर्वसाधारणपणे शुभ व अनुकुल होईल. आर्थिक प्रगती होईल; पण त्याच्यामुळे संततिपैकी कोणास कशाचा तरी असह्य त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या व्यय स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून गुरु ग्रह अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. तसेच

समाजसेवेची आवड असणारांनाही हा गुरु अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण प्रवासात त्रास होण्याची शक्यता असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. नेपच्यूनमुळे नैराश्य येईल पण तो गुप्त पोलिसखात्यातील कर्मचाऱ्यांना अनुकुल होईल श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मनःशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः “ मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यानी “ ओम पूषाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====